१६.निवडनस्ती (शिक्षण-१).

Principal
Nutan Maharashtra Institute of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech. PUNE 410507

आपले सरकार महाDBT

# 1. Rules for application for re-applying any scheme In A.Y. 2020-21

Before applying application to any scheme for A.Y. 2020-21, all your applications from previous year i.e. A.Y. 19-20 should be disposed. Disposed means the status of the application must be Approved, Rejected, Allotted or Disbursed. Please note, you cannot apply the application for A.Y. 20-21 if your application is in under scrutiny or send back status.

As we have clarified the cases below, the applicant must follow the steps as per your applicable case.

- **Case-1**

**Fresh Student to the Portal for AY 2020-21**

- ✓ Applicant should register on MahaDBT Portal
- ✓ Applicant should login into MahaDBT Portal
- ✓ Applicant should create his/her profile
- ✓ Applicant should apply for scheme

- **Case-2**

**Last year Passed (A.Y. 2019-20) Students or Students with Gap & also benefits received Students**

**Scenario-1: Fresh Application- (Previous year all the applications disposed)**

- ✓ Applicant should register on MahaDBT Portal
- ✓ Applicant should login into MahaDBT Portal
- ✓ Applicant should create his/her profile
- ✓ Applicant should apply for scheme

**Scenario-2: Re-Apply Case- (Scrutiny desk sent back the application to re-apply)**

- ✓ Applicant will have to update the required information in the profile or scheme specific as requested by the scrutiny
- ✓ Applicant have to re-apply application
- ✓ Application Scrutiny should be completed
- ✓ Allotment will be done



Principal
Nutan Maharashtra Institute
of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech.
PUNE 410507

- **Case-3**

**Last year Passed (A.Y.19-20) Students but Scrutiny still Pending for AY 19-20**

- ✓ Application scrutiny should be completed
- ✓ Application allotment will be done
- ✓ Applicant will be able to apply for A.Y. 20-21

- **Case-4**

**Reapply Pending Student (A.Y.19-20) {Both Schemes Specific & Profile related changes}**

- ✓ Applicant will have to update the required information in the profile or scheme specific as requested by the scrutiny
- ✓ Applicant have to re-apply application
- ✓ Application scrutiny should be completed
- ✓ Application allotment will be done
- ✓ Applicant will be able to apply for A.Y. 20-21

- **Case-5**

**Non Aadhaar Registered Student (A.Y. 19-20) if updated Aadhaar then 1 step back**

- ✓ If applicant update to Aadhaar then again scrutiny by last concern desk
- ✓ Application allotment will be done
- ✓ Applicant will be able to apply for A.Y. 20-21



Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech. PUNE
Principal
Nutan Maharashtra Institute of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

## 2. Guidelines for changing profile and submitting applications for the new academic year, for candidates already registered in the portal

**Dear Applicant,**

In order to apply the scheme for new academic year, make sure below changes should be done in your user profile (Note: User profile is in editable format)

**Step 1:-** Personal Information: If any updation done in your aadhaar card then in Personal information tab click on Update Profile as per Aadhaar.

**Step 2:-** Address Information: Update address information Correspondence Address Details.(Only if Required)

**Step 3:-** Other Information: Update Other information.(Only if Required)

**Step 4:-** Current course:1. In Current Course Section following details needs to be updated.

***Example I:-*** If your current course was first year pursing for A.Y 2018-19 then for A.Y 2019-20 follow the below steps

1. Click on delete button to delete the entirely filled pursuing course information and again fill all details of last year pursuing course and select as completed and then fill current year pursuing course details accordingly
2. Enter Percentage
3. Select from drop down for Result
4. Upload Mark sheet.
5. Add Second year details as pursuing
6. Update Admission date
7. Update fees paid
8. Upload fee receipt

**Example II:-** If the Applicant Current course for Under Graduate Course was last year pursuing and now applicant is pursuing his first year Post Graduate Course then follow below step.

1. Delete all Under Graduate Course details from Current course and put the same in Past qualification.
2. In current course for A.Y 2019-20 Insert first year Post Graduate Course details.



Principal
Nutan Maharashtra Institute
of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech.
PUNE 410507

**Example III:-** If Applicant changes his course for first year even after receiving scholarship for his old course.

1. Delete all details from Current course.
2. Add New Details in Current Course.

Step 5:-Past Qualification: Make the changes in the past qualification (if applicable).
Step 6:-Hostel Details: Make the changes in the Hostel Details(if applicable).

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech. PUNE 410507

अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत अदा करावयाच्या इतर शुल्काच्या (other fees) बाबी निश्चित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्र. अजाशि-२०१९/प्र.क्र.३४५/शिक्षण-१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १५ जानेवारी, २०२०

वाचा :-

(१) शासन निर्णय, सा.न्या.सा.का.क्रि व वि.स. विभाग क्र.इबीसी-२००३/प्र.क्र..३०१/मावक-२, दिनांक १ नोव्हेंबर,२००३.

(२) शासन निर्णय, सा.न्या. सा.का.क्रि.व वि.स. विभाग क्र. इबीसी-२००४/प्र.क्र.३०/मावक-२, दिनांक ५ जानेवारी,२००५.

(३) शासन परिपत्रक, सा.न्या.सा.का.क्रि.व वि.स. विभाग क्र.इबीसी-२००५/प्र.क्र.१२८/मावक-२, दिनांक २७ जून, २००५.

(४) शासन परिपत्रक, सा.न्या. सा.का.क्रि व वि.स. विभाग क्र. इबीसी-२०१७/प्र.क्र.४५/शिक्षण, दिनांक ५.१२.२०१८.

(५) आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचे पत्र क्र.सकआ/शिक्षण/भासशि/२०१९-२०/का-४ब/२५२६, दिनांक २५.११.२०१९

प्रस्तावना :-

अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयामध्ये कला, विज्ञान आणि वाणिज्य या शाखामध्ये शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना, त्या महाविद्यालयाच्या संबंधित विद्यापीठाने ठरविलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्क, प्रयोगशाळा शुल्क, ग्रंथालय शुल्क, इतर शुल्क, एक्स्ट्रा क्युरिक्युलर ॲक्टीव्हिटीज, मॅगेझीन फी, नोंदणी शुल्क, कॉम्प्युटर प्रॅक्टिकल शुल्क व परिक्षा शुल्क याची महाविद्यालयाला प्रतिपूर्ती करण्याच्या सूचना संदर्भीय दिनांक २७ जून, २००५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या होत्या.

२. तद्नंतरच्या कालावधीमध्ये महाविद्यालयांमार्फत राबविण्यात येत असलेल्या वैविध्यपूर्ण उपक्रमांमुळे इतर शुल्कांच्या बाबींमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्याचबरोबर इतर शुल्कांच्या बाबनिहाय फीमध्ये महाविद्यालय/ विद्यापीठनिहाय मोठ्या प्रमाणावर भिन्नता दिसून आल्याने, इतर शुल्कांच्या बाबी नेमक्या कोणत्या असाव्यात, याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागाने सर्व महाविद्यालयांकडून माहिती मागवून, सर्व प्रशासकीय विभागांसाठी

Mr. Bhase/Accounts
17/1/20
Noted
17/01/2020

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engg. & Technology
Talegaon Dabhade, 410507
Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech. PUNE

सर्वसंम्मतीने इतर शुल्कांच्या एकूण १६ बाबी निश्चित केल्या आहेत. इतर शुल्काच्या सदर १६ बाबी ह्यां माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून महाडीबीटी प्रणालीवर अपलोड करण्यात आलेल्या असुन, त्यानुसार सन २०१८-१९ मध्ये अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक लाभ देण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने, आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी संदर्भीय दिनांक २५.११.२०१९ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन, इतर शुल्का मधील सदरील १६ बाबी अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता विहीत करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

सन २०१८-१९ पासून महाडिबीटी प्रणालीद्वारे अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना, **भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत** शैक्षणिक लाभ महाडिबीटी प्रणालीद्वारे अदायगीसाठी इतर शुल्कांच्या खालील १६ बाबी विहीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.:-

| अ.क्र | इतर शुल्काची बाब |
|---|---|
| १ | प्रवेश फी (अनुदानित /विनाअनुदानित ) |
| २ | प्रयोगशाळा शुल्क |
| ३ | ग्रंथालय शुल्क |
| ४ | जिमखाना शुल्क |
| ५ | विविध गुणदर्शन/उपक्रम शुल्क |
| ६ | कॉलेज मॅगजीन फी |
| ७ | संगणक प्रशिक्षण फी |
| ८ | नोंदणी शुल्क |
| ९ | विद्यापीठ विकास निधी |
| १० | विद्यापिठ क्रिडा निधी |
| ११ | विद्यापीठ अश्वमेध निधी |
| १२ | विद्यापीठ वैद्यकीय मदत निधी |
| १३ | विद्यापीठ विद्यार्थी सहाय्य निधी |
| १४ | विद्यापीठ विद्यार्थी विमा निधी |
| १५ | युथ फेस्टिवल निधी |
| १६ | विद्यार्थी ओळखपत्र शुल्क |

३. इतर शुल्काच्या वरील १६ बाबींच्या शुल्काची अचूक परिगणना करुन, बाबनिहाय शुल्क अंतिम करुन, सदर शुल्क हे समक्ष प्रधिकरण/प्राधिकारी/प्रशासकीय विभाग यांच्या मान्यतेने महाडीबीटी पोर्टलवर अपलोड केल्याचे संबंधित महाविद्यालयाने प्रमाणित करणे अनिवार्य राहील.

Nutan Maharashtra Institute of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul", Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech. PUNE 410507

४. इतर शुल्कामध्ये समाविष्ट १६ बाबींपैकी एखाद्या बाबीचे शुल्क अवास्तव असल्याचे तसेच सदर शुल्कास समक्ष प्राधिकारी यांची मान्यता नसल्याचे निदर्शनास आल्यास व त्याव्दारे शासनाचे आर्थिक नुकसान झाल्यास, त्यासाठी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना व्यक्तिशः जबाबदार धरण्यात येऊन शासनाची आर्थिक फसवणूक केल्याबद्दल त्यांच्याविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यास येईल, याबाबत संबंधित प्रशासकीय विभागांनी आवश्यक त्या सूचना संबंधितांना निर्गमित कराव्यात.

५. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२००११५१७५२१८००२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजाटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार वा नावाने.

Chandrakant haridas Wade

Digitally signed by Chandrakant haridas Wade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justic and S. A., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fda96a8ca4dd3ecbdbbe4b156e5eaa93f60f3e037cbbbbdefe9e2961f45f0960, cn=Chandrakant haridas Wade
Date: 2020.01.16 15:14:57 +05'30'

(चंद्रकांत ह. वडे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

(१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
(२) मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
(३) मा.मंत्री, सामाजिक न्याय, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव,
(४) मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव,
(५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
(६) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
(७) अपर मुख्य सचिव, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
(८) अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
(९) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
(१०) प्रधान सचिव (पदुम), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
(११) प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
(१२) प्रधान सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
(१३) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
(१४) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
(१५) संचालक, वि.जा.भ.ज., इ.मा.व. व वि.मा.प्र. संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
(१६) संचालक, उच्च व तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

Principal
Nutan Maharashtra Institute of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech. PUNE

(१७) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

(१८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई. (प्रसिध्दीसाठी)

(१९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.

(२०) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.

(२१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

(२२) प्रादेशिक उपायुक्त/सहायक आयुक्त, समाजकल्याण,सर्व प्रादेशिक विभाग

(२३) सहायक आयुक्त, समाजकल्याण, सर्व जिल्हे.

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engineering & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech.

विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीची योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुरू ठेवण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन शुद्धीपत्रक क्रमांक : व्यअप्र-२०१६/प्र.क्र.१२२/का.१२**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०५ मार्च, २०२०.

वाचा :- १. आदिवासी विकास विभाग, समक्रमांक शासन निर्णय, दि.३१.०३.२०१६.
२. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२(भाग-३)/तांशि-४, दि.०७ ऑगस्ट, २०१८.

**शासन शुद्धीपत्रक :-**

संदर्भ क्र.०१ येथील दिं.३१.०३.२०१६ रोजीच्या शासन निर्णयामधील शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत लाभाच्या पात्रतेसाठी अटी व शर्ती या मथळ्याखाली **अट क्र.२४** मध्ये "सदर योजनेंतर्गत पात्र असणारे व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या संबंधित शैक्षणिक संस्थांनी पुढील ३ वर्षाच्या आत म्हणजेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पर्यंत सक्षम शिखर संस्थेकडून मूल्यांकन व दर्जाचा मानांकन प्राप्त करणे (Assessment and Accreditation) आवश्यक राहील. तदनंतर शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून संबंधित शिखर संस्थांकडून मूल्यांकन व दर्जा निश्चिती करुन मूल्यांकन प्राप्त न केल्यास अशा संस्थांना मुल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त होईपर्यंत या योजनेतून वगळण्यात येईल व त्या वर्षापासून केवळ मानांकन प्राप्त करणाऱ्या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिताच सदर योजना लागू राहील".

**या ऐवजी**

२४) "सदर योजनेंतर्गत पात्र अभ्यासक्रम राबविणाऱ्या संबंधित शैक्षणिक संस्था (NAAC, NBA इ.) मूल्यांकन/पुनर्मूल्यांकन करण्यास पात्र ठरल्यानंतर त्यांना शैक्षणिक वर्ष २०१९-२० अखेरपर्यंत सक्षम शिखर संस्था/यंत्रणा/मंडळाकडून (Assessment and Accreditation) असे मूल्यांकन व दर्जाचे मानांकन प्राप्त करून घेण्यासाठी अर्ज करणे क्रमप्राप्त राहील", असे वाचावे.

याव्यतिरिक्त योजनेच्या सर्व अटी व शर्ती पूर्वीप्रमाणचे राहतील.

सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२००३१२१११०५१४६२२४ असा आहे. हे शुद्धीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subrao Narayan Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Subrao Narayan Shinde
Date: 2020.03.12 11:07:44 +05'30'

**(सु.ना.शिंदे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech.
PUNE

महाराष्ट्र शासन

इतर मागास बहुजनकल्याणविभाग

मंत्रालय (विस्तार), दालनक्र.१३९

मादामकामामार्ग, हुतात्माराजगुरुचौक, मुंबई-४०००३२

दुरध्वनीक्र.-०२२-२२८२३८२१

---

क्रमांक-शिष्यवृत्ती-२०१७/प्र.क्र.१३ /शिक्षण दिनांक: ०१/०६/२०२०.

प्रति,

१)संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे.

२)सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण.

३) सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण.

विषय :शासनाचे पत्र क्र. शिष्यवृत्ती-२०१७/प्र.क्र.१३ /शिक्षण. दि. १६/०३/२०२० रोजीच्या पत्रामध्ये बदल करण्याबाबत.

संदर्भ :१.शासनाचे पत्र क्र. शिष्यवृत्ती-२०१७/प्र.क्र.१३ /शिक्षण, दि. १६/०३/२०२०.

२.शासन निर्णय क्र. विजाभ २००५/प्र.क्र.३७/मावक-३, दि. २१ जानेवारी, २००८.

**महोदय,**

संदर्भ क्र. १ येथे नमूद पत्रान्वये विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना केंद्र पुरस्कृत मॅट्रीकोतर शिष्यवृत्ती या योजनेचा लाभ घेण्याकरिता ज्या विद्यार्थ्यांनी आपले अर्ज दाखल केले आहेत, त्यांनी कोणत्याही अभ्यासक्रमास सामाईक प्रवेश परीक्षेव्दारे (कॅप) प्रवेश घेतला नसल्यास शिष्यवृत्ती व फ्रि-शिपचा लाभ घेता येणार नाही.

उपरोक्त बाब विचारात घेता संदर्भ क्र. २ येथे नमूद शासन निर्णयान्वये इमाव, विजाभज व विमाप्र प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांचे उत्पन्न रु.१०००००/- (रुपये एक लाख फक्त) पर्यंत असेल फक्त त्याच विद्यार्थ्यांना भारत सरकारची मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना (केंद्र पुरस्कृत योजना) लागू राहील. ज्या विद्यार्थ्यांचे/पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.१०००००/- (रुपये एक लाख फक्त) पर्यंत असेल त्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती अदा करण्यासाठी सामाईक प्रवेश परीक्षेची (कॅप) सक्ती करण्यात येऊ नये. यापुढे कोणत्याही धोरणात्मक बाबींवर संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांनी शासनाच्या मान्यतेशिवाय कोणतेही पत्र/ परिपत्रक निर्गमित करु नये.

आपला,

(अ.र.जगताप)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech.

Scanned with CamScanner

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून महाडिबीटी पोर्टलद्वारे कार्यान्वित करण्यात आलेल्या शिष्यवृत्ती वितरण प्रणालीद्वारे शैक्षणिक संस्था व अर्जदार विद्यार्थी यांना शिष्यवृत्ती रक्कमेची अदायगी होण्यासाठी अनिवार्य असलेल्या Redeem Button सक्रीयकरणाची जबाबदारी संबंधित शैक्षणिक संस्था व विद्यार्थी यांची असल्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग
आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : ईबीसी-२०१७/प्र.क्र.७३/शिक्षण
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०३ जुलै, २०१९

वाचा :- १) विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाचे शासन परिपत्रक क्र. ईबीसी-२०१७/ प्र.क्र.७३/ शिक्षण, दि.२४ मे, २०१९.
२) विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाचा शासन निर्णय क्र. विभशा-२०१८/ प्र.क्र.१३५/ शिक्षण, दि.१९ जून, २०१८.

प्रस्तावना:-

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून राज्य शासनाच्या महाडिबीटी प्रणालीद्वारे विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागातील शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहेत. आजमितीस एकूण ०८ योजना महाडिबीटी प्रणालीवर कार्यान्वित आहेत. सदर ०८ योजनांतर्गत शैक्षणिक संस्थांकडून संबंधित जिल्हयाच्या सहायक आयुक्तांच्या Login मध्ये प्राप्त झालेल्या अर्जांची तपासणी सहायक आयुक्त स्तरावर करण्यात येते. अर्जांच्या पडताळणीअंती प्राप्त अर्जांमध्ये काही त्रुटी असल्यास, असे अर्ज महाविद्यालयांकडे परत पाठविण्यात येतात, तर परिपूर्ण अर्ज अनुज्ञेय शिष्यवृत्ती रक्कमेच्या अदायगीसाठी आवश्यक असलेल्या पुढील संस्करणासाठी forward करण्यात येतात. अंतिमतः संबंधित विद्यार्थी यांनी शिष्यवृत्ती अदायगीसाठी होण्यासाठी अनिवार्य असलेल्या Redeem Button चे सक्रीयकरण करणे आवश्यक असते. त्याशिवाय संबंधित विद्यार्थ्यांचा अर्ज PFMS Portal वर पाठविता येत नाही. त्यामुळे पुढील सर्व प्रक्रिया ठप्प होऊन जाते. परंतू बरेच विद्यार्थी Redeem Button चे सक्रीयकरण करण्यामध्ये कालापव्यय करत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे संबंधित विद्यार्थी तसेच शैक्षणिक संस्थांना अनुज्ञेय शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण करण्यास विलंब होतो. संबंधित विद्यार्थी शिक्षण संस्थेमध्ये शिकत असल्याने संबंधित शिक्षण संस्थेने विद्यार्थ्यांशी संपर्क करुन Redeem Button वापरण्यासाठी विद्यार्थ्यांचे प्रबोधन आवश्यक आहे.

२. उक्त पार्श्वभूमीवर शैक्षणिक संस्थांना शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण वाजवी वेळेत होत नसल्यामुळे शैक्षणिक संस्था वाचा क्र.२ येथे नमूद दि.१९.६.२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार निर्माण करुन दिलेल्या अर्धन्यायिक स्वरुपाच्या कार्यपध्दतीचा अवलंब न करता थेट मा.उच्च न्यायालयात प्रशासकीय

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

विभाग, संबंधित सहायक आयुक्त व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण यांच्याविरुध्द याचिका दाखल करतात. मा.उच्च न्यायालयासमोर दाखल करण्यात आलेल्या याचिकेमध्ये प्रलंबित शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण संबंधित शैक्षणिक संस्था व विद्यार्थी यांनी करावयाच्या कार्यवाहीमुळे जरी प्रलंबित असले तरी त्याचे दायित्व शासनाकडे दाखविण्यात येते. अशावेळी मा.उच्च न्यायालयासमोर शासनाची भूमिका मांडणे अडचणीचे ठरते. या पार्श्वभूमीवर खालील प्रमाणे शासन परिपत्रक निर्गमित करण्यात येते आहे.

**<u>शासन परिपत्रक :-</u>**

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून पोर्टलद्वारे कार्यान्वित करण्यात आलेल्या शिष्यवृत्ती वितरण प्रणालीद्वारे शैक्षणिक संस्था व अर्जदार विद्यार्थी यांना शिष्यवृत्ती रक्कमेची अदायगी होण्यासाठी अनिवार्य असलेल्या Redeem Button सक्रीय करण्याबाबत महाडिबीटी प्रणालीअंतर्गत SMS Generate होवून संबंधित विद्यार्थी यांनी प्रणालीवर नोंद केलेल्या भ्रमणध्वनीवर पाठविण्यात येतो. संबंधित शैक्षणिक संस्था यांनादेखील याबाबतची माहिती पोर्टलवर उपलब्ध होवू शकते. या पाश्वभूमीवर विद्यार्थ्यांना Redem Button सक्रीय करण्यासाठी संबंधित शैक्षणिक संस्थांनी त्वरित सूचित करुन Redeem Button सक्रीय होईल याची दक्षता घ्यावी. भविष्यात Redeem Button सक्रीय न झाल्यामुळे शैक्षणिक संस्थांची शिष्यवृत्ती रक्कम प्रलंबित राहिल्यास त्याची जबाबदारी विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाची राहणार नाही. कारण विद्यार्थी त्याच शिक्षण संस्थेत शिकत असतो, दर दिवशी वर्गात उपस्थित राहतो त्यामुळे संबंधित शिक्षण संस्थांचे प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांशी संपर्क करुन Redeem Button वापरण्यासाठी प्रवृत्त केले पाहिजे. जर विद्यार्थ्यांने Redeem Button वापरले नाही तर ती जबाबदारी शासनाची नसून संबंधित संस्था / विद्यार्थ्याची आहे. Pool Account मध्ये निधी असतानासुध्दा Redeem Button न वापरल्यामुळे निधी पडून राहत असेल तर त्यामुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीची जबाबदारी शासनाची राहणार नाही.

२. राज्यातील सर्व जिल्हयांच्या सहायक आयुक्त, समाज कल्याण यांनी सदर शासन परिपत्रक स्वतंत्र पत्राद्वारे त्यांच्या जिल्हयातील सर्व शैक्षणिक संस्थांच्या निदर्शनास आणून सदर हा शासन परिपत्रक सर्व शैक्षणिक संस्थांना प्राप्त झाल्याबाबतची पोच कार्यालयीन अभिलेखात जतन करुन ठेवावी. भविष्यात एखादया संस्थेने प्रलंबित शिष्यवृत्ती रक्कमेबाबत मा.उच्च न्यायालयात दाद मागितल्यास व सदर प्रलंबित शिष्यवृत्ती Redem Button च्या सक्रीयीकरणाअभावी प्रलंबित असल्यास मा.न्यायालयात विभागाची भूमिका मांडण्यासाठी या अभिलेखांचा तपशील मा.उच्च न्यायालयासमोर सादर करण्यात यावा. तसेच शासन निर्णय दि.१९.६.२०१८ प्रमाणे न्यायालयात जाण्यापूर्वी अर्धन्यायिक व्यवस्थेचा उपयोग करावा याबाबत सर्व संस्थांना लेखी कळवावे. जर अर्धन्यायिक व्यवस्थेचा उपयोग न करता शैक्षणिक संस्थांनी थेट न्यायालयात दाद मागितल्यास तातडीने मा.न्यायालयाच्या निदर्शनास दि.१९.६.२०१८ चा शासन निर्णय आणावा आणि पर्यायी व्यवस्था उपलब्ध असताना न्यायालयात जाणे योग्य नाही हे मा.न्यायालयाच्या निदर्शनास प्रथम शपथपत्राद्वारे आणावे.

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engineering & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech. Pune

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपल करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०७०३१७५३५०९१२२ असा आहे. हे परिपत्रक डिजीट स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAVINDRA
VASANTRAO
GURAV

Digitally signed by RAVINDRA VASANTRAO GURAV
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b72632195861c3f9cd5fd67e55000ce92, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=9dfb7aefbd9e82b129c324d567b46e13c38d6e222c868eac72ecd12784, ou=VJNT OBC ANC DEPT, o=GOVERNEMENT OF MAHARASHTRA, cn=RAVINDRA VASANTRAO GURAV
Date: 2019.07.03 18:01:28 +05'30'

(रविंद्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण (सर्व)
३. सहायक आयुक्त, समाज कल्याण (सर्व)
४. सहायक आयुक्त, जिल्हा परिषद (सर्व)
५. जिल्हा समाज कल्याण अधिकारी (सर्व)
६. निवड नस्ती, कार्या- शिक्षण.

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engineering & Technology
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech. PUNE 410507

शासकीय आदिवासी वसतीगृहामध्ये खास बाब म्हणून प्रवेश देण्याबाबत सुधारीत मार्गदर्शक तत्वे.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक :- आवगृ-२०१९/प्र.क्र.१०३/का.१२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दि. २० ऑगस्ट, २०१९

वाचा :- १) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आवप्र-१२०४/प्र.क्र.५२/का-१२, दिनांक ३.८.२००४
२) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक आवगृ-१२०५/प्र.क्र.७६/का-१२, दिनांक २१.९.२००५
३) आदिवासी विकास विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक आवगृ-१२०५/प्र.क्र.७६/का-१२, दिनांक १९.७.२००६

प्रस्तावना :-

आदिवासी विकास विभागामार्फत राज्यातील अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींना तालुका, जिल्हा व विभागीय स्तरावर माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण घेता यावे याकरीता राज्यभरामध्ये शासकीय आदिवासी वसतीगृहे कार्यरत आहेत. सदर वसतीगृहांमध्ये विदयार्थ्यांना प्रवेश देण्यासंदर्भात उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ येथील दि.३.८.२००४ च्या शासन निर्णयान्वये नियमावली लागू केलेली आहे. तसेच उपरोक्त संदर्भाधीन क्र.२ व ३ येथील दि.२१.९.२००५ व १९.७.२००६ च्या शासन निणर्यांन्वये सदर वसतीगृहांमध्ये विद्यार्थ्यांना खास बाब अंतर्गत प्रवेश देण्याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. सदर वसतीगृहांमध्ये विदयार्थ्यांना खास बाब म्हणून प्रवेश देण्याच्या सध्याच्या प्रक्रीयेमध्ये/तरतुदीमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सदर शासन निर्णयान्वये, शासकीय आदिवासी वसतीगृहांमध्ये विदयार्थ्यांना खास बाब म्हणून प्रवेश देण्यासंदर्भातील उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ येथील दि.३.८.२००४ च्या शासन निर्णयातील परिच्छेद १ मधील (अ)(२) येथील तरतुद रद्द करुन, तसेच उपरोक्त संदर्भाधीन क्र.२ व ३ येथील दि.२१.९.२००५ व १९.७.२००६ चे शासन निर्णय अधिक्रमित करुन पुढील मार्गदर्शक तत्वे शासन लागू करीत आहे.

(१) आदिवासी मुला-मुलीच्या प्रत्येक शासकीय वसतीगृहात त्या त्या वर्षी उपलब्ध असलेल्या एकूण जागांच्या ५ % जागा मागासवर्गीय (अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती, भटक्या व विमुक्त जाती आणि इतर मागासवर्गीय ) विदयार्थ्यांमधून "खास बाब" म्हणून शासन स्तरावरुन भरल्या जातील.

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech.
PUNE 410507

महाराष्ट्र शासन

# सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, पुणे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, स.नं.१०४/१०५, विश्रांतवाडी रोड, पोलिस स्टेशनसोर, येरवडा, पुणे-०६
दुरध्वनी क्रमांक: ०२०-२९७०६६११
E-mail : acswopune@gmail.com

जा.क्र.सआसकपुणे/भासशि/against cap scholarship/२०२०-२१/1048 दि.०३.०१.२०२१

प्रति,

प्राचार्य,

सर्व महाविद्यालये (पुणे जिल्हा)

विषय :- भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठी अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना सामाईक प्रवेश परिक्षाद्वारे (कॅप) प्रवेश घेतल्या असल्याबाबतच्या अटींची सक्ती न करणेबाबत

संदर्भ :- १. मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.सकआ/शिक्षण/कॅप राऊंड/सक्ती/२०१५-१६/४६२ दि.०६.०२.२०१६

२. इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे शासनपत्र शिष्यवृत्ती-२०१७/प्र.क्र.१३/शिक्षण दि.०१.०६.२०२०

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये केंद्र पुरस्कृत अनुसूचित जातीच्या मुलामुलींसाठी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती या योजनेसाठी विद्यार्थ्याने कोणत्याही अभ्यासक्रमास प्रवेश घेताना तो सामाईक प्रवेश परिक्षाद्वारे (कॅप) घेतला असला पाहिजे अशी सक्ती करण्यात येवू नये असे कळविण्यात आले आहे. तसेच संदर्भ क्र. २ चे शासनपत्राद्वारे ज्या विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.१,००,०००/- (रु. एक लाख रुपये फक्त) पर्यंत असेल त्यांना भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अदा करण्यासाठी सामाईक प्रवेश परीक्षेची (कॅप) सक्ती करण्यात येऊ नये असे कळविले आहे.

त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (Scholarship) साठी अनुसूचित जाती, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना सामाईक प्रवेश परिक्षाद्वारे (कॅप) प्रवेश घेतल्या असल्याबाबतच्या अटींची सक्ती करण्यात येवू नये.

सदर बाब केवळ भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (Post Matric Scholarship) साठी लागू आहे. शासन निर्णय क्र. इबीसी-२०१६/प्र.क्र.२२१/शिक्षण-१ दि. ३१ मार्च २०१६ नुसार शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना (Freeship) साठी व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेश घेतला असल्याचे CAP Allotment Letter सादर करणे बंधनकारक आहे याची कृपया नोंद घ्यावी. || लागू नाहि

संगीता एन डावखर
सहायक आयुक्त,
समाज कल्याण, पुणे

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

१. मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१

२. मा. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१

३. मा. प्रादेशिक उपआयुक्त, समाज कल्याण, पुणे विभाग, पुणे - ०६

Principal
Nutan Maharashtra Institute of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech. PUNE 410507

Scanned by CamScanner

राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना उत्पन्न मर्यादा वाढ करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : शिवृत्ती २०२१/प्र.क्र.२६/शिक्षण
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई
दिनांक :- २२ मार्च,२०२१

वाचा :- १) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. विजाभ २००५/ प्र.क्र.३७/मावक-३, दि. २१/०१/२००८
२) केंद्र शासनाची मार्गदर्शक सूचना सप्टेंबर, २०१८.

प्रस्तावना :-

इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकारकडून दिल्या जाणाऱ्या मॅट्रिकेत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या मार्गदर्शक सूचना सप्टेंबर, २०१८ अन्वये विद्यार्थ्यांच्या पालकांच्या उत्पन्न मर्यादेत केंद्र शासनाने रु.१.०० लाख ( अक्षरी रक्कम रुपये एक लाख फक्त) वरुन रु. १.५० लाख (अक्षरी रक्कम रुपये दीड लाख फक्त) अशी वाढ केलेली आहे. सदर उत्पन्न मर्यादेतील वाढ राज्यात लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

इतर मागासवर्गायांसाठी भारत सरकारची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना (केंद्र पुरस्कृत योजना) या योजनाचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांची उत्पन्नाची मर्यादा रु.१.०० लाख ( अक्षरी रक्कम रुपये एक लाख फक्त) वरुन रु. १.५० लाख (अक्षरी रक्कम रुपये दीड लाख फक्त) इतकी करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या इतर मागासवर्गीयांच्या यादीत राज्यातील बहुतांशी विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील जातींचा समावेश आहे. त्यामुळे सदरचा शासन निर्णय विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील असलेल्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठी लागू राहील.

२. सदर शासन निर्णय केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे व केंद्र शासनाने लागू केलेल्या निर्देशाप्रमाणे राहतील.

३. पुढील आदेश होईपर्यंत विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत उर्वरीत अटी व शर्ती संदर्भीय दि. २१/०१/२००८ शासन निर्णयासोबतच्या केंद्र शासनाच्या नियमावली प्रमाणे राहतील.

४. यासाठी होणारा खर्च विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गासाठी असलेल्या शालांत परीक्षोत्तर मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती या योजनेसाठी असलेल्या प्रधान शिर्षाखाली संबंधीत आर्थिक वर्षात उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानातून तसेच पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

Dr. Bhase - Pl. note
& for students notice
20/8/21

Principal
Nutan Maharashtra Institute of Engg. & Technology
Pune 410507

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०३२६१३२६०६६९२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

JAGTAP AJIT RAMESH

Digitally signed by JAGTAP AJIT RAMESH

(अजित जगताप)

कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
४. मा. राज्यमंत्री, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
५. मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
६. मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
७. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
८. मा. मंत्री, कृषी व प.दु.म विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
९. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०. अपर मुख्य सचिव, कृषी व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. प्रधान सचिव (प.दु.म.), कृषी व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन सर्व विभाग.
१७. आयुक्त, समाज कल्याण, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१८. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१९. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२०. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१. महासंचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२३. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२५. सर्व प्रादेशिक उपायुक्त/सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग.
२६. निवासी लेक्षा परिक्षा अधिकारी, मुंबई.
२७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२८. कक्ष अधिकारी, विधानमंडळ इतर मागासवर्ग कल्याण समिती, विधानभवन, मुंबई.
२९. निवड नस्ती (कार्यासन-शिक्षण).

राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना उत्पन्न मर्यादा वाढ करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : शिवृत्ती २०२१/प्र.क्र.२६/शिक्षण
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई
दिनांक :- २२ मार्च,२०२१

वाचा :- १) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. विजाभ २००५/ प्र.क्र.३७/मावक-३, दि. २१/०१/२००८
२) केंद्र शासनाची मार्गदर्शक सूचना सप्टेंबर, २०१८.

**प्रस्तावना :-**

इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकारकडून दिल्या जाणाऱ्या मॅट्रिकेत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या मार्गदर्शक सूचना सप्टेंबर, २०१८ अन्वये विद्यार्थ्यांच्या पालकांच्या उत्पन्न मर्यादेत केंद्र शासनाने रु.१.०० लाख ( अक्षरी रक्कम रुपये एक लाख फक्त) वरुन रु. १.५० लाख (अक्षरी रक्कम रुपये दीड लाख फक्त) अशी वाढ केलेली आहे. सदर उत्पन्न मर्यादेतील वाढ राज्यात लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

इतर मागासवर्गायांसाठी भारत सरकारची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना (केंद्र पुरस्कृत योजना) या योजनाचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांची उत्पन्नाची मर्यादा रु.१.०० लाख ( अक्षरी रक्कम रुपये एक लाख फक्त) वरुन रु. १.५० लाख (अक्षरी रक्कम रुपये दीड लाख फक्त) इतकी करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या इतर मागासवर्गीयांच्या यादीत राज्यातील बहुतांशी विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील जातींचा समावेश आहे. त्यामुळे सदरचा शासन निर्णय विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील असलेल्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठी लागूं राहील.

२. सदर शासन निर्णय केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे व केंद्र शासनाने लागू केलेल्या निर्देशाप्रमाणे राहतील.

३. पुढील आदेश होईपर्यंत विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत उर्वरीत अटी व शर्ती संदर्भीय दि. २१/०१/२००८ शासन निर्णयासोबतच्या केंद्र शासनाच्या नियमावली प्रमाणे राहतील.

४. यासाठी होणारा खर्च विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गासाठी असलेल्या शालांत परीक्षोत्तर मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती या योजनेसाठी असलेल्या प्रधान शिर्षाखाली संबंधीत आर्थिक वर्षात उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानातून तसेच पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

Principal
Nutan Maharashtra Institute of Engineering & Technology
"Samarth Nagari", Vishnupuri Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech. PUNE 410507

## महाराष्ट्र शासन

क्र.शिष्यवृ-२०१८/प्र.क्र.८३/का-१२
आदिवासी विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई -३२.
दि. २९ ऑगस्ट, २०१८.

प्रति,

१. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक.
२. सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास.
३. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

विषय :- विकास निधी मंजूर करण्याबाबत.

संदर्भ :- १. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.व्यअप्र-२०१६/प्र.क्र.१२२/ का-१२, दि.३१.०३.२०१६.

२. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगाव यांचे पत्र क्र.जा.क्र.भासशि-१२१४/प्र.क्र. /का-१(४)/२३३८, दि.१६.०५.२०१८.

विभागाच्या संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील विनाअनुदानित तसेच कायम विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क समिती, प्राधिकरण किंवा परिषदेने निर्धारीत केलेल्या दराप्रमाणे १००% परिक्षा शुल्क आणि शिक्षण शुल्काची प्रतिपुर्ती करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. सदर निर्णयमध्ये परिक्षा शुल्क आणि शिक्षण शुल्क वगळता इतर शुल्क अदा करण्याबाबत स्पष्ट उल्लेख आलेला नाही.

२. प्रस्तुत प्रकरणी कळविण्यात येते की,

I. केंद्र शासनाच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या दि.०१.०७.२०१० रोजीच्या नियमावलीतील परिच्छेद ४ मध्ये (Value of Scholarship) शिष्यवृत्ती अंतर्गत देय असलेल्या घटकांचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. त्यानुसार संबंधित महाविद्यालयांना / संस्थांना विकास निधी देय आहे.

II. त्याचप्रमाणे दि.३१.०३.२०१६ रोजीच्या संदर्भाधिन शासन निर्णयान्वये राबविण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत यापुढे शिक्षण शुल्क समिती/प्राधिकरण/ परिषदेने निर्धारीत केलेल्या दराप्रमाणे मंजूर असलेले शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्क संबंधित विद्यार्थी/ संबंधित शैक्षणिक संस्थांना अदा करण्यात यावे.

(डु.पो.नैलावरम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

F:\VIJAY\SCHOLARSHIPS\FEE REIMBURSMENT\DEVELOPMENT FEES.docx

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engineering & Technology
Vishnupuri

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech.
PUNE

“राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना” या योजनेतील लेखाशिर्षात सुधारणा करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : अर्थसं-२०२०/(४६/२०)/मशि-३**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार इमारत, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २३ ऑक्टोबर, २०२०.

**संदर्भ:** १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दिनांक ०७ ऑक्टोबर, २०१७.
२) संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र. २०१९-२०/व्हाईट बुक/योजना नांव बदल/शिष्यवृत्ती/१७१४, दिनांक १० फेब्रुवारी, २०२०.

**प्रस्तावना :**

संदर्भीय दिनांक ०७/१०/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितीत अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रु.६ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष सन २०१७-१८ पासून “राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना” ही योजना लागू करण्यात आली आहे. सदर योजनेच्या लेखाशिर्षातील “ज्यांचे किंवा ज्यांच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु.६,००,०००/- पेक्षा अधिक नाही अशा विद्यार्थ्यांना फी माफी” यामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

संदर्भीय शासन निर्णयान्वये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांसाठी लागु करण्यात आलेल्या “राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना” या योजनेच्या लेखाशिर्षात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :-

| योजनेचे लेखाशिर्ष | योजनेचे सुधारीत लेखाशिर्ष |
|---|---|
| Demand No. W-2<br>2202-General Education<br>80-General<br>800-Other Expenditure<br>02- Miscellaneous<br>(02)(09) – Freeship to Students Whose or Whose Parents Income does not exceeds Rs.6,00,000 per annum (Scheme) (2202 1456) | Demand No. W-2<br>2202-General Education<br>80-General<br>800-Other Expenditure<br>02- Miscellaneous<br>(02)(09) – Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Tuition Fee Scholarship (Scheme) (2202 1456) |

Principal
Nutan Maharashtra Institute of Engineering & Technology
"Samarth Nagari" Vishnupuri
Talegaon Dabhade, Pune-410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. PUNE

| | |
|---|---|
| मागणी क्रमांक डब्ल्यू-२<br>२२०२- सर्वसाधारण शिक्षण<br>८०- सर्वसाधारण<br>८००-इतर खर्च<br>०२-संकीर्ण<br>(०२)(०९) ज्यांचे किंवा ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.६,००,००० पेक्षा अधिक नाही अशा विद्यार्थ्यांना फी माफी (कार्यक्रम) (२२०२ १४५६) | मागणी क्रमांक डब्ल्यू-२<br>२२०२- सर्वसाधारण शिक्षण<br>८०- सर्वसाधारण<br>८००-इतर खर्च<br>०२-संकीर्ण<br>(०२)(०९) राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती (कार्यक्रम) (२२०२ १४५६) |

२. हे आदेश नियोजन विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.७०/१४७१, दिनांक १८/०२/२०२० व वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.२४/अर्थ-८/२०२०,दिनांक २१/१०/२०२० तसेच महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - १ महाराष्ट्र, मुंबई यांचा अनौपचारिक संदर्भ क्र.१३/२०२०-२१/४०, दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२० अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२०१०२३१८२५३७१२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Hemantkumar Pandharinath Baviskar

Digitally signed by Hemantkumar Pandharinath Baviskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=71de9bdf8c28541d92a5cd36d722315bab7f006ec54206337 22d42c0976d82a8, cn=Hemantkumar Pandharinath Baviskar
Date: 2020.10.23 17:44:50 +05'30'

**( हे. पं. बाविस्कर )**

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.

३) सह संचालक, उच्च शिक्षण सर्व विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य.

४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

५) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.

**प्रत,**

१) महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२ , मुंबई/नागपूर.

२) महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र १/२ , मुंबई/नागपूर.

३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/(VLC Section), एक महाराष्ट्र, मुंबई.

४) वित्त विभाग, ( व्यय-५/अर्थसंकल्प-८), मंत्रालय, मुंबई.



Principal
Nutan M... Institute
of E... ...ology
"Samarth ... Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & ...
PUNE 410507

५) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

६) कार्यासन क्र. साशि-१/मशि-२, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

७) निवड नस्ती कार्यासन मशि-३, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

Principal
Nutan M[illegible] Institute
of E[illegible]ology
"Samarth V[illegible]" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech.
PUNE 410507

Date 02/01/18 File

राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थामधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्ती योजनेतंर्गत पालकांची उत्पन्न मर्यादा वाढविणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व
विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग
शासन निर्णय क्रमांक: इबीसी -२०१७/ प्र.क्र.२७/ शिक्षण
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०१ जानेवारी, २०१८

वाचा : १. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. इबीसी-२०१६/ प्र.क्र.२२१/ शिक्षण-१, दिनांक ३१.मार्च,२०१६

२. शासन निर्णय, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, क्रमांक सीबीसी-१०/२००८/प्र.क्र .६९७/विजाभज-१, दि.१६ डिसेंबर,२०१७

**प्रस्तावना :**

राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने आणि शासकिय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती,भटक्या जमाती ,इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत पालकांची वार्षिक उत्पन्न रुपये ६.०० लक्ष वरुन रुपये ८.०० लक्ष करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय-**

राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने आणि शासकिय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती,भटक्या जमाती ,इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून रुपये ६.०० लक्ष वरुन रुपये ८.०० लक्ष करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सुधारित उत्पन्न मर्यादा सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रथम/द्वितीय/तृतीय/चतुर्थ वर्षात शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू करण्यात येत आहे.

३. सदर योजनेच्या अटी/शर्ती शासन निर्णय,क्र.इबीसी -२०१६/प्र.क्र.२२१/शिक्षण-१,दि.३१ मार्च,२०१६ नुसार राहतील.

Information
Mr. Khese - Pl. put up notice for Students

Principal
Nutan Maharashtra Institute of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507
Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech. PUNE

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०११७२१०५७०२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षंकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=69245478380361bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2018.01.01 17:25:34 +05'30'

(भा.र.गावित)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव ,राजभवन,मलबारहिल,मुंबई
२. मा.मुख्यमंत्रीयांचे अ.मु.स .सचिव,मंत्रालय,मुंबई
३. मा.मंत्री,विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
४. मा.राज्यमंत्री,विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
५. मा.मंत्री,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
६. मा.मंत्री,उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
७. मा.मंत्री,कृषी व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
८. मा.मुख्य सचिव ,महाराष्ट्र राज्य ,मुंबई
९. अपर मुख्य सचिव ,कृषी व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई
१० अपर मुख्य सचिव ,वित्त विभाग ,मंत्रालय,मुंबई
११ अपर मुख्य सचिव ,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,मंत्रालय,मुंबई
१२ अपर मुख्य सचिव ,नियोजन विभाग ,मंत्रालय,मुंबई
१३ मा.प्रधान सचिव (पदुम), कृषी व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई
१४ मा.सचिव ,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय,मुंबई
१५ मा.सचिव, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण मंत्रालय,मुंबई
१६ आयुक्त ,समाज कल्याण आयुक्तालय ,महाराष्ट्र राज्य ,पुणे
१७ संचालक ,विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे
१८ अपर मुख्यसचिव /प्रधान सचिव / सचिव मंत्रालयीन सर्व विभाग
१९ सर्व सह सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी विजाभज ,इमाव व विमाप्र कल्याण विभाग मंत्रालय,मुंबई
२० सर्व सह सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी ,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय, मुंबई
२१ संचालक,तंत्र शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई
२२ संचालक ,वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई
२३ महासंचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय,मंत्रालय,मुंबई (प्रसिध्दीसाठी)
२४ महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपुर
२५ महालेखापाल,(लेखा परीक्षा)महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपुर
२६ अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
२७ सर्व प्रादेशिक उपायुक्त/सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण विभाग

Principal
Nutan Maharashtra Institute of Engg. & Technology
"Samarth Vidyapeeth", Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech.

२८ निवासी लेखा परिक्षा अधिकारी,मुंबई
२९ सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
३० कक्ष अधिकारी ,वित्त विभाग(व्यय-१४/अर्थ-५)मंत्रालय,मुंबई
३१ कक्ष अधिकारी, विधानमंडळ अनुसूचित जाती कल्याण समिती,विधानभवन,मुंबई
३२ कक्ष अधिकारी ,विधानमंडळ इतर मागासवर्ग कल्याण समिती,विधानभवन,मुंबई
३३ सचिव ,माहिती व तंत्रज्ञान मंत्रालय यांना महाडिबीटी पोर्टलवर योग्य ती नोंद घेण्यासाठी
३४ निवड नस्ती (शिक्षण).

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech. PUNE 410507

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engineering & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

INWARD No. 2128
Date 07/03/17 File

महाराष्ट्र शासन

समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ३ चर्चरोड, पुणे ४११ ००१.
दूरध्वनी क्रमांक ०२० २६१२७५६९ / ०२० २६१२२५५२
ई-मेल directorsocialwelfare@yahoo.co.in

परिपत्रक

क्र.सकआ/शिक्षण/दोन वेळा अनुत्तीर्ण विद्यार्थी/ शुल्क प्रतिपुर्ती/ २०१६-१७/594.
दिनांक :- ४.३.२०१७

प्रति,
१) प्रादेशिक उपायुक्त,
समाज कल्याण विभाग सर्व
२) सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण सर्व

विषय :- दोन किंवा दोन पेक्षा जास्त वेळा अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काची प्रतीपुर्ती न करणेबाबत....

संदर्भ :- शासन निर्णय क्र. ईबीसी २०१६/प्र.क्र. २२१/शिक्षण १ दि. ३१.३.२०१६

संदर्भाकीत शासन निर्णयाचा चुकीचा अर्थ लावून राज्यातील ब-याच विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शासनमान्य व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या खाजगी संस्थामार्फत विद्यार्थ्यांची अडवणूक करणे व त्यांच्याकडून फी वसूल करणे असे प्रकार आयुक्तालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आलेले आहेत.

याबाबत खालील प्रमाणे खुलासा निर्गमित करण्यात येत असून आपल्या स्तरावरुन ही बाब आपल्या अखत्यारीतील सर्व खाजगी शासन मान्यता प्राप्त विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या शिक्षण संस्थांच्या निदर्शनास आणावी. याबाबत कुठल्याही अनुसुचित जाती, विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना वंचित ठेवले जाणार नाही, याची खबरदारी घेणेबाबत कळवावे.

संदर्भाकीत शासन निर्णय (२) परिच्छेद १३ खालील प्रमाणे आहे.

" परंतू असे पात्र लाभार्थी विदयार्थी अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतर संपूर्ण अभ्यासक्रमाच्या एकूण कालावधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळी पूर्णतः अनुत्तीर्ण झाल्यामुळे त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाला नसेल तर संबंधित विदयार्थी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या उर्वरीत कालावधीसाठी सदर योजनेंतर्गत लाभाकरीता कायमस्वरुपी अपात्र ठरेल "

याबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१. सदरचा शासन निर्णय हा दि. ३१.३.२०१६ रोजी निर्गमित झालेला असल्यामुळे या शासन निर्णयाची अंमलबजावणी यामध्ये नमुद केल्याप्रमाणे सन २०१५-१६ या वर्षापासून होईल.

Nutan ... Institute
... Vishnupuri
Telegaon ... 410507

Maharashtra Inst. of Engg. PUNE

Sent 08/03/17

Scanned by CamScanner

२. सदरचा शासन निर्णय हा केवळ महाराष्ट्र शासनामार्फत दिल्या जाणा-या शिक्षण फी व परिक्षा फी प्रतिपूर्तीसाठी राज्यातील शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या अनु. जाती, विजाभज, इमाव व विमाप्र विद्यार्थ्यांसाठी लागू राहील.

३. या शासन निर्णयातील तरतुदी ह्या भारत सरकार शिष्यवृत्ती या योजनेसाठी लागू नाहीत

४. हा शासन निर्णय निर्गमित होण्यापुर्वी प्रत्येक वर्षी या योजनेकरीता शासन निर्णय निर्गमित होत असे. ज्या त्या वर्षी निर्गमित आलेल्या शासन निर्णयातील तरतुदी या त्या शासन निर्णयात नमूद केलेल्या कालावधीसाठीच सिमीत आहेत. तेव्हा संदर्भाधीन शासन निर्णयाचा वेगळा अर्थ काढून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वंचीत करण्यात येऊ नये अशा सूचना निर्गमित कराव्यात

आयुक्त, समाज कल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत :-

१) मा.सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई - ३२

२) खाजगी सचिव, मा.मंत्री सामाजिक न्याय यांना देवून कळविण्यात येते की, सदर बाब मा.मंत्री महोदय यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

३) खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री सामाजिक न्याय यांना देवून कळविण्यात येते की, सदर बाब मा.मंत्री महोदय यांच्या निदर्शनास आणून द्यावी

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech. * Pune

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engineering & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

canned by CamScanner

विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग मधील उन्नत व प्रगत व्यक्ती/गट या करिता नॉन क्रिमीलेयर साठी असलेली उत्पन्न मर्यादा वाढविणे बाबत.

## महाराष्ट्र शासन

विजाभज इमाव व विमाप्र कल्याण विभाग

**शासन निर्णय क्रमांक : सीबीसी-१०/२००८/प्र.क्र.६९७/विजाभज-१**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४४०००३२

दिनांक: १६ डिसेंबर २०१७

<u>वाचा</u> :-

१) शासन निर्णय क्रमांक : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: सीबीसी-१०/२००८/प्र.क्र.६९७/मावक -५दि.१३त जानेवारी,२००९

२) शासन निर्णय क्रमांक: सामाजिक न्याय व विशेष सहय्यक विभाग, क्रंमाक :सी.बी.सी-१०/२००८/प्र.क्र.६९७/मावक-५ दि.५दि.२४जून,२०१३

३) शासन निर्णय क्रमांक: मिनीस्ट्री ऑफ पर्सोनल, पब्लिक ग्रीव्हन्सेस ॲड पेंन्शस,डिपार्टमेंन्ट ऑफ पर्सोनेल ॲन्ड ट्रेनिग भारत सरकार यांचे ऑफिस मेमोरेन्डम क्रंमाक ३६.३३/१/२०१३ इएसटी (आरईस), दिनांक१३/९/२०१७

<u>प्रस्तावना</u> : -

महाराष्ट्र राज्य लोकसेवा अुनसूचित जाती, जमाती ,निरधि सूचित जमाती, (वि. जा) भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्या साठी आरक्षण अधिनियम २००१(सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) अन्वये महाराष्ट्र राज्यातील विमुक्त जाती,भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग मधिल उन्नत व प्रगत व्यक्ती/गट वगळून आरक्षणाचे फायदे लागू करण्यात आलेले आहेत.उच्च व उन्नत व्यक्ती/गटासाठी राज्य शासनाने उपरोक्त वाचा येथील क्रमांक १ येथील शासन निर्णय दिनांक १३ जानेवारी,२००९ अन्वये कैाटुंबिक उत्पन्न मर्यादा, केंद्रशासनाच्या धर्तीवर रु.४.५० एवढी करण्यात आली होती. तसेच सदर शासन निर्णयान्वये केंद्र शासना कडून या पुढे ज्या-ज्या वेळी उत्पन्न मर्यादत वाढ केली जाईल तीच उत्पन्न मर्यादा यापुढे महाराष्ट्र राज्यातील आरक्षण सोई सवलती करिता उन्नत व प्रगत गट/व्यक्ती करिता लागू राहील असा निर्णय घेण्यात आला आहे. या अनुंषगाने केंद्र शासनाने केलेल्या उत्पन्न मर्यादत केलेल्या वाढीच्या अनुषंगाने उपरोक्त वाचा येथील क्रंमाक २ शासन निर्णयान्वये सदर उत्पन्न मर्यादा रुपये ४.५० लाख वरुन रुपये ६.०० एवढी वाढ केलेली आहे. आता केंद्रशासनाने त्याच्या उपरोक्त वाचा येथील क्रंमाक ३ येथील ऑफीस मेमोरेन्डम अन्वये ६.०० लाख उत्पन्न मर्यादित वाढ करुन सदर उत्पन्न मर्यादा रुपये ८.००लाख इतकी केली आहे. सदर उत्पन्न मर्यादेत केलेली वाढ राज्यातील विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग,इतर मागासवर्ग या मधील उन्नत व प्रगत व्यक्ती/ गट वगळून आरक्षणाचे फायदे देण्यासाठी लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती...

Sh. Bhase → Noted. Please notify for concerned students for implementation accordingly. → for records

18/12/17

Registrar → O.S → Shri Bhase

19.12.17

Principal
Nutan Maharashtra Institute of Engg. & Technology
Talegaon Dabhade, 410507

**शासन निर्णय :-**

राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती,विशेष मागासप्रवर्ग या मधील उन्नत व प्रगत व्यक्ती/गट या करिता नॉनक्रिमीलेयरसाठी असलेली उत्पन्न मर्यादाही रु ६.०० लक्ष वरुन रुपये ८.००लक्ष इतकी वाढ करण्यास या द्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे. ज्याचे उत्पन्न मागील सलग तीन आर्थिक वर्षामध्ये प्रत्येक वर्षी रुपये ८.०० लाखापेक्षा जास्त आहे. अशाना आरक्षणाचा लाभ मिळणार नाही .

२) तसेच केंद्र शासनाने इतर मागास प्रवर्गामधील उन्नत व प्रगत व्यक्ती/गट वगळून आरक्षणाचे फायदे देण्यासाठी दिनांक १३/०९/२०१७ ऑफीस मेमोरन्डम नुसार उत्पन्न मर्यादेत वाढ करुन ती रुपये ८.००लाख वार्षिक करण्यात आलेली आहे.( सदर ऑफीस मेमोरन्डमची प्रत केंद्र शासनाच्या मिनिस्ट्रीऑफ मिनिस्ट्री ऑफ पर्सोनेल पब्लिक ग्रीव्हन्सेस ॲंड पेन्शस, डिपार्टमेन्ट ऑफ पर्सोनल ॲन्ड ट्रेंनिग भारत सरकार च्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे).केद्र शासनाने अखत्यारीतील आरक्षण व सेवा विषयक लाभासाठी केंद्र शासनाने महाराष्ट्राशी संबधित जी इतर मागासवर्गीयांची यादी निशिचीत केलेली आहे त्यांना रु.८.०० लाख एवढी वार्षिक उत्पन्न मर्यादा लागू राहील.

३) सदर आदेश दिनांक १ सप्टेंबर, २०१७ पासून अमंलात राहतील.

४) सदर शासन निर्णय वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्रमांकः१९३/२०१७/ व्यय-१४,दि ३०/११/२०१७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१७१२१६१५१०४२५०२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao
Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=69245478380 3b1bf08bc0ff2505a01eb578c61edfbb82745 7be5704f5b440067,
serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489 ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2017.12.16 14:59:23 +05'30'

(भा. र. गावित)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा.मंत्री, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
४. मा.राज्यमंत्री, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507



Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech.

६. मा. प्रधान सचिव, महसूल व वन/वित्त/ नियाजोन/ग्रामविकास/गृह निर्माण/उघोग,उर्जा व कामगार/उच्च व तंत्रशिक्षण/वैघकीशिक्षण व औषधी द्रव्ये/कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
७. मा.सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
८. महासंचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई(प्रसिध्दीसाठी)
९. संचालक विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. सर्व मंत्रालयीन विभाग
११. सर्व विभागीय आयुक्त
१२. सर्व जिल्हाधिकारी
१३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१४. व्यवस्थापकीय संचालक, वंसतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, मुंबई
१५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ, मुंबई
१६. सर्व उपविभागीय अधिकारी
१७. सर्व तहसिलदार
१८. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई
१९. संचालक, उच्च शिक्षण, पुणे
२०. संचालक, वैघकिय शिक्षण व संशोधन, मुंबई
२१. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग
२२. सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग
२३. सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
२४. सर्व अध्यक्ष, विभागीय जात प्रमाणप्रत्र पडताळणी समिती
२५. सर्व कार्यासन अधिकरी, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय,मुंबई

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech. PUNE 410507

राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्ती योजनेतंर्गत पालकांची उत्पन्न मर्यादा वाढविणेबाबत .

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्र. इबीसी -२०१४/प्र.क्र.९६ /शिक्षण-१,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २० ऑगस्ट, २०१६.

वाचा- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक इबीसी २०१६/ प्र.क्र.२२१/शिक्षण-१, दिनांक ३१ मार्च, २०१६

**प्रस्तावना :**

राज्यातील शासकिय, अशासकिय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतने आणि शासकिय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेतंर्गत पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये ४.५० लक्ष वरुन रुपये ६.०० लक्ष करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

राज्यातील शासकिय, अशासकिय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतने आणि शासकिय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेतंर्गत पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून रुपये ४.५० लक्ष वरुन रुपये ६.०० लक्ष करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सुधारित उत्पन्न मर्यादा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रथम/द्वितीय/तृतीय/चतुर्थ वर्षात शिकत असणा-या विद्यार्थ्यांना लागू करण्यात येत आहे.

३. सदर योजनेच्या अटी/शर्ती शासन निर्णय क्रमांक इबीसी २०१६/ प्र.क्र.२२१/शिक्षण-१, दिनांक ३१ मार्च, २०१६ नुसार राहतील.

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech.

राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्ती योजनेतंर्गत पालकांची उत्पन्न मर्यादा वाढविणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्र. इबीसी -२०१४/प्र.क्र.९६ /शिक्षण-१,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २० ऑगस्ट, २०१६.

वाचा- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक इबीसी २०१६/ प्र.क्र.२२१/शिक्षण-१, दिनांक ३१ मार्च, २०१६

प्रस्तावना :

राज्यातील शासकिय, अशासकिय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतने आणि शासकिय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेतंर्गत पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये ४.५० लक्ष वरुन रुपये ६.०० लक्ष करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :

राज्यातील शासकिय, अशासकिय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतने आणि शासकिय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेतंर्गत पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून रुपये ४.५० लक्ष वरुन रुपये ६.०० लक्ष करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सुधारित उत्पन्न मर्यादा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रथम/द्वितीय/तृतीय/चतुर्थ वर्षात शिकत असणा-या विद्यार्थ्यांना लागू करण्यात येत आहे.

* ३. सदर योजनेच्या अटी/शर्ती शासन निर्णय क्रमांक इबीसी २०१६/ प्र.क्र.२२१/शिक्षण-१, दिनांक ३१ मार्च, २०१६ नुसार राहतील.

Registrar/ Scholarship Section.
for n.a. Af 22/8/16

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech.
PUNE
410507

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०८२०१६०७४३८१२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh Ramchandra Dingle

Digitally signed by Dinesh Ramchandra Dingle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400051, st=Maharashtra, cn=Dinesh Ramchandra Dingle
Date: 2016.08.20 16:08:37 +05'30'

(दि.रा.डिंगळे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१)मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२)मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३)मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
४) मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
५) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
६) मा.मंत्री, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
७) मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
८)मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९)अपर मुख्य सचिव, कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०)अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११)अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२)अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३)प्रधान सचिव (पदुम), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५) संचालक, वि.जा.भ.ज., इ.मा.व विशेष मागास वर्ग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६)संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१७)संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१८)महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिद्धीसाठी)
१९)महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२०)महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२१)अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२२)सर्व प्रादेशिक उपायुक्त/सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग,
२२)निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२३)सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२४) कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-१४/अर्थ-५), मंत्रालय, मुंबई.
२५) कक्ष अधिकारी, विधानमंडळ अनुसूचित जाती कल्याण समिती, विधानभवन; मुंबई
२६) कक्ष अधिकारी, विधानमंडळ इतर मागासवर्ग कल्याण समिती, विधानभवन, मुंबई
२७)निवड नस्ती ( कार्यासन शिक्षण-१).

Principal
Nutan Maharashtra Institute of Engineering & Technology
"Samarth Nagari", Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. PUNE 410507

राज्यातील शासनमान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीची योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुरू ठेवण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## आदिवासी विकास विभाग
## शासन निर्णय क्रमांकः व्यअप्र-२०१६/प्र.क्र.१२२/का.१२

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: ३१ मार्च, २०१६.

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांकः उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.टीईएम-२०१५/प्र.क्र.२१९/ तांशि-४, दि.३१ मार्च, २०१६.

प्रस्तावना -

राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती या योजनेस प्रथम सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षाकरीता मंजूरी देण्यात आली होती. त्यानंतर सन २०१४-१५ पर्यंत दरवर्षी सदर योजना राबविण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे. सदरहू योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून सुरु ठेवण्याबाबतच्या प्रस्तावास दिनांक १७.०३.२०१६ च्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये सुधारणांसह मान्यता देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.३१.०३.२०१६ रोजीच्या शासन निर्णयाच्या धर्तीवर सदरहू योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुधारीत अटी व शर्तीनुसार सुरु ठेवण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

## शासन निर्णय -

राज्यातील शासकिय, अशासकिय, अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतने आणि शासकिय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची सन २०१५-१६ या वर्षापासून शिक्षण शुल्क समिती, प्राधिकरण किंवा परिषदेने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्कांची प्रतिपूर्ती करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. सदर योजना सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून खालील व्यावसायिक अभ्यासक्रमांत प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाच्या पूर्ण कालावधीपर्यंत लागू राहील.

अ) आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम (वैद्यकीय, दंत, होमिओपॅथी, युनानी, आयुर्वेद, भौतिकोपचार, व्यवसायोपचार व नर्सिंग)

Nutan Maharashtra Institute of Engg. & Tech. Pune 410507

ब) उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत असणारे अभ्यासक्रम :

| पदविका | पदवी | पदव्युत्तर पदवी |
|---|---|---|
| अभियांत्रिकी | अभियांत्रिकी | एम.बी.ए. |
| औषधनिर्माणशास्त्र | औषधनिर्माणशास्त्र | एम.सी.ए. |
| एच.एम.सी.टी. | एच.एम.सी.टी. | -- |
| -- | वास्तुशास्त्र | -- |

क) कृषी, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागांतर्गत पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच बी.एस.सी. (जैव तंत्रज्ञान).

ड) इयत्ता १० वीची शालांत परिक्षा (एस.एस.सी/सी.बी.एस.सी. व तत्सम) उत्तीर्ण झाल्यानंतरचे महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे पूर्ण वेळ अभ्यासक्रम.

३. या योजनेचा लाभ अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना पुढील **अटी व शर्तींच्या** अधिन राहून देण्यात येईल:-

१) सदरहू योजनेचा लाभ शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पूर्वी वा चालू शैक्षणिक वर्षामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमांच्या पूर्ण कालावधीपर्यंत या आदेशातील अटी शर्तीनुसार लागू राहील.

२) अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी शासनाच्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (सी.ई.टी.) प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना लागू राहील. सदर योजनेचा लाभ संस्था स्तरावर करण्यात येत असलेल्या (Institutional Level Quota) परिक्षेद्वारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

३) आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांसाठी शासनाच्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (सी.ई.टी.) प्रवेश घेतलेल्या तसेच खाजगी विनाअनुदानीत महाविद्यालयाच्या वतीने तसेच असोसिएशनमार्फत घेण्यात येणाऱ्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (Associate CET) आणि इ.१२ वी च्या गुणांच्या आधारे काही अभ्यासक्रमांसाठी (उदा.नर्सिंग) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू राहील.

४) शालेय शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित, अध्यापक विद्यालय (डी.एड) व उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या अध्यापक महाविद्यालयांमध्ये (बी.एड) शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्काची प्रतिपूर्ती सध्या शासकीय दराप्रमाणे करण्यात येते. तेथे ती पुढे चालू ठेवण्यात यावी.

५) कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्यव्यवसायाच्या काही अभ्यासक्रमांसाठी शासनाची सामायिक परिक्षा (सी.ई.टी.) घेण्यात येत नाही. त्यावेळी इ. १२ वी च्या गुणांच्या आधारावर अशा अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ही योजना लागू राहील.

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech. PUNE 410507

६) तंत्र शिक्षणाशी निगडीत पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी ज्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे (CAP) प्रवेश घेतलेला आहे, अशा विद्यार्थ्यांना ही योजना लागू राहील.

७) थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी तसेच औषधीनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमास केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे (CAP ) प्रवेश घेतलेला आहे, अशा विद्यार्थ्यांना ही योजना लागू राहील.

८) सदरहू योजनेचा लाभ एआयईईई कोटयातून प्रवेश घेणा-या महाराष्ट्र राज्यातील उमेदवारांनाही लागू राहील.

९) सदरहू योजना ही खाजगी अभिमत विद्यापीठात (Deemed University) अथवा खाजगी स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठातील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत अनुज्ञेय राहणार नाही.

१०)ही योजना अनिवासी भारतीयांकरिता (N.R.I.) विहीत कोट्यात व्यवस्थापनामार्फत देण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

११)शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांपैकी केवळ काणत्याही एकाच योजनेंतर्गत लाभ मिळण्यास संबंधित विद्यार्थी पात्र असेल. म्हणजेच अन्य योजनेच्या माध्यमातुन विद्यार्थी कोणत्याही शिष्यवृत्ती / शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ घेत असल्यास तो विद्यार्थी या योजनेंतर्गत लाभ मिळण्यास पात्र असणार नाही.

१२)आरक्षणाचा लाभ न घेता, गुणवत्तेनुसार खुल्या गटातील जागांवर प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी सुध्दा सदरची योजना लागू राहील.

१३)सदर योजनेचा लाभ घेणाऱ्या सर्व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येवू नये.

१४)सदर योजनेंतर्गत देण्यात येणारा लाभ हा शासनाने निश्चित केलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केवळ महाराष्ट्र राज्यातील अधिवास प्रमाणपत्र असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच मर्यादित राहिल.

१५)लाभार्थी विद्यार्थ्याने नियमितपणे महाविद्यालय / तंत्रनिकेतनामध्ये शिक्षणासाठी वर्गात उपस्थित राहणे आवश्यक राहिल व प्रत्येक सत्र अथवा वर्षाची परीक्षा देणे आवश्यक राहिल. केवळ विशिष्ट परिस्थितीत विशेषत: आजारपणाच्या कारणास्तव परीक्षा देणे शक्य झाले नसल्यास तसे संबंधित विद्यार्थी व शैक्षणिक संस्थेने शिफारस केल्यानंतर संबंधीत प्रकल्प अधिकारी, यांनी प्रमाणित करणे आवश्यक राहिल.

१६)पात्र लाभार्थी विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेतल्यानंतर एखादया सत्राची (सेमिस्टरची) परीक्षा दिली नसल्यास अथवा एखादया शैक्षणिक वर्षात अनुत्तीर्ण झाल्याने त्या वर्षासाठी प्रवेश मिळाला नसल्यास पुढील वर्षाकरिता सदर योजनेंतर्गत सदर विद्यार्थी लाभ मिळण्यास अपात्र राहिल.



Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech. PUNE 410507

१७) तथापि, तदनंतर पुनश्च: त्या सत्र/वर्षात परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर अथवा अंशत: पास (ATKT) झाल्याने त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाल्यास सदर योजनेतील लाभासाठी पुन्हा पात्र ठरेल.

१८) परंतु असे पात्र लाभार्थी विदयार्थी अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतर संपूर्ण अभ्यासक्रमाच्या एकूण कालावधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळी पूर्णत: अनुत्तीर्ण झाल्यामुळे त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाला नसेल तर संबंधित विद्यार्थी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या उर्वरित कालावधीसाठी सदर योजनेंतर्गत लाभाकरिता कायमस्वरुपी अपात्र ठरेल.

१९) लाभार्थी विदयार्थी व संबंधित शिक्षण संस्था यांनी सदर योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी सादर केलेल्या अर्जात चूकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती सादर केल्यास त्यास उर्वरित अभ्यासक्रमाच्या कालावधीसाठी लाभ देण्यात येणार नाही. तसेंच, त्या विद्यार्थ्याला/संस्थेला त्यांनी सादर केलेल्या चूकीच्या माहितीच्या आधारे त्यापूर्वी मिळालेल्या लाभाच्या संपूर्ण रकमेची व्याजासह वसूली करण्यात येईल व कोणत्याही योजनेंतर्गत संबंधित विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती/शुल्क प्रतिपूर्ती मिळण्यास प्रतिबंधित केले जाईल. या संदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याची असेल.

२०) संबंधित विद्यार्थी स्वत:च्या चुकीच्या वर्तनामुळे समाधानकारक शैक्षणिक प्रगती करीत नसल्याबाबत किंवा संबंधित प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय अनियमितपणे गैरहजर राहणे इत्यादी स्वरुपाचे गैरवर्तन करत असल्याबाबत संबंधित शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने निदर्शनास आणले तर अशा विद्यार्थ्याची शुल्क प्रतिपूर्ती थांबविण्यात किंवा रद्द करण्यात येईल.

२१) ज्या अभ्यासक्रमाकरिता पात्र लाभार्थी विद्यार्थ्यास प्रतिपूर्ती प्रदान करण्यात आली आहे तो अभ्यासक्रम संबंधित विद्यार्थ्याने मध्येच सोडला तर अशा विद्यार्थ्यास प्रदान केलेल्या प्रतिपूर्तीची रक्कम राज्य शासनास योग्य वाटल्यास त्याच्या/तिच्याकडून वसुल केली जाईल.

२२) सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबत कोणत्याही पूर्वसूचना न देता बदल अथवा सुधारणा करण्याचे अधिकार शासनास राहतील व असे बदल केल्यामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्याबाबतचा दावा कोणत्याही विद्यार्थ्यास किंवा शैक्षणिक संस्थेस अथवा विद्यार्थ्याच्या पालकांना शासनाच्या विरुध्द करता येणार नाही.

२३) सदर योजनेच्या लाभाकरिता शासकीय अथवा शासन अनुदानित शैक्षणिक संस्था किंवा शासकीय विदयापीठ वगळून अन्य सर्व खाजगी विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमधील पात्र विदयार्थ्यांचे प्रवेश व विद्यार्थ्यांकडून आकारावयाचे असलेले शिक्षण शुल्क हे महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक (प्रवेश व शिक्षण शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतूदीनुसार शुल्क नियामक प्राधिकरणाकडून प्रत्येक वर्षी निश्चित करुन अंतिम करणे आवश्यक राहील.

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. & Tech.

२४) सदर योजनेंतर्गत पात्र असणारे व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या संबंधित शैक्षणिक संस्थांनी पुढील ३ वर्षाच्या आत म्हणजेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पर्यंत सक्षम शिखर संस्थेकडून मूल्यांकन व दर्जाचा मानांकन प्राप्त करणे (Assessment and Accreditation) आवश्यक राहील. तदनंतर शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून संबंधित शिखरं संस्थांकडून मूल्यांकन व दर्जा निश्चिती करुन मूल्यांकन प्राप्त न केल्यास अशा संस्थांना मुल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त होईपर्यंत या योजनेतून वगळण्यात येईल व त्या वर्षापासून केवळ मानांकन प्राप्त करणाऱ्या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिताच सदर योजना लागू राहील.

**<u>शुल्क प्रतिपूर्तीच्या वितरणाची कार्यपद्धती:-</u>**

२५) सदर योजनेंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या पात्र लाभार्थींचे ऑनलाईन अर्ज स्विकारण्यासाठी ई-विकास प्रणाली कार्यरत असून सदर प्रणाली संबंधित विद्यापीठाशी जोडून त्याद्वारे संबंधित पात्र लाभार्थींनी परीक्षा दिली आहे किंवा नाही याची पडताळणी करण्यासाठीची सोय करण्यात यावी. याकरीता सर्व संबंधित विद्यापीठाकडून सक्षम प्राधिकाऱ्यांना त्यांच्या संगणक प्रणालीशी जोडण्यासाठी आवश्यक असलेले सर्व प्रकारचे सहकार्य करणे अनिवार्य असेल.

२६) प्रत्येक लाभार्थी विद्यार्थ्याचा आधार क्रमांक किंवा विशिष्ट संगणकीय क्रमांक नमूद करुन संबंधित विद्यार्थी प्रत्येक वर्षाच्या प्रथम सत्राच्या / वर्षाच्या परीक्षेस बसला असल्याबाबत संगणकीय प्रणालीव्दारे खातरजमा करुन त्या विद्यार्थ्याची सर्व माहिती शैक्षणिक संस्थेने ऑनलाईन स्वरुपात प्रमाणित करुन ऑनलाईन अर्ज सक्षम अधिकाऱ्याकडे सादर करणे आवश्यक राहिल.

२७) प्रत्येक लाभार्थी विद्यार्थी हा संबंधित शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतल्याची अथवा शिक्षण घेत असल्याची व शैक्षणिक संस्थेत बनावट विद्यार्थ्यांची नोंद नसल्याची संगणकीय प्रणालीद्वारे पडताळणी करणे आवश्यक असेल.

२८) सक्षम प्राधिकाऱ्यास ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यामधील विद्यार्थ्याची सर्व माहिती व त्यास दिलेला प्रवेश हा प्रवेश नियमन प्राधिकरणाद्वारे वैध ठरविण्यात आल्याची पडताळणी करावी.

२९) पात्र विद्यार्थ्यांची माहिती आधार क्रमांक किंवा विशिष्ट संगणकीय क्रमांकाशी संबंधित संचालनालय/ शैक्षणिक संस्था/विद्यापीठ यांचेकडील अथवा अन्य उपलब्ध व्यक्तिगत माहितीशी संलग्नीत झाल्यानंतर संबंधित विद्यार्थी प्रत्यक्षात शैक्षणिक संस्थेत शिकत असल्याची आणि शैक्षणिक वर्षाच्या प्रथम सत्राच्या परीक्षेस बसला असेल अशा व केवळ उपरोक्त नमूद सर्व अटी/शर्तीची पूर्तता करत असलेल्या विद्यार्थ्यांनाच सदर योजनेतील लाभासाठी पात्र समजण्यात येईल.

३०) ज्या अभ्यासक्रमांना सत्र परीक्षा पध्दती लागू नाही, अशा अभ्यासक्रमाकरीता संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश हा प्रवेश नियमन प्राधिकरण व संबंधित विद्यापीठाने निश्चित केल्यानंतर विद्यापीठाच्या पटावर नोंदविण्यात आलेला नोंदणी क्रमांक तपासून संबंधित अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांला व



Principal
Nutan Maharashtra Institute
of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507
Nutan Maharashtra Inst. of Engg. & PUNE 410507

सहा महिन्याचे पट पडताळून त्याला प्रमाणपत्र दिल्यावर लाभासाठी निश्चित करण्यात येईल. संस्थेने खोटे प्रमाणपत्र दिल्यास संस्थेवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

३१)अशा पात्र विद्यार्थ्यांची विहित मर्यादेतील प्रतिपूर्ती सक्षम प्राधिकाऱ्याकडून ही थेट स्वरुपात संबंधित शिक्षण संस्थेला त्यांच्या बँक खात्यात ECS द्वारे प्रतिपूर्ती करणे आवश्यक असेल.

३२)वरीलप्रमाणे पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती केल्यानंतर दरवर्षी अशा लाभार्थी विद्यार्थ्यांची अभ्यासक्रम व शैक्षणिक संस्थानिहाय सविस्तर यादी आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर न चुकता प्रसिध्द करणे बंधनकारक असेल.

३३)तसेच सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांपोटी शासनाकडून संबंधित शैक्षणिक संस्थांना अदा करण्यात येणाऱ्या शुल्क प्रतिपूर्तीबाबत वेळोवेळी संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी लाभार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व उपस्थिती बाबत खात्री करावी. त्यासाठी आवश्यक त्या सूचना वेळापत्रकासह संनियंत्रण अधिकाऱ्यांनी निर्गमित कराव्यात. तसेच या योजनेतील त्रुटी संदर्भातील निरीक्षण व फलनिष्पत्तीचा अहवाल प्रकल्प अधिकाऱ्यांनी आयुक्तालयामार्फत शासनास न चुकता वेळोवेळी सादर करणे अनिवार्य असेल.

३४)सदर योजनेंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्याऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क प्रतीपूर्तीची अंमलबजावणी करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना सनियंत्रन व समन्वयक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३५)सदर योजनेच्या वर नमूद सुधारीत अंमलबजावणीच्या पध्दतीबाबत व योजनेच्या फलनिष्पत्तीसंदर्भात शैक्षणिक वर्ष संपण्यापूर्वी न चुकता सविस्तर आढावा घ्यावा. तसेच आढाव्याअंती आवश्यकतेनुरुप योजनेच्या अंमलबजावणीत सुधारणा सुचविण्यात याव्यात.

३६)या बाबीवर होणारा खर्च मागणी क्रमांक टी-५, मुख्य लेखाशिर्ष २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण - राज्य योजनांतर्गत योजना - (०१)(३३) वैद्यकीय व तत्सम अभ्यासक्रमासाठी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या (२२२५ ३५२९) ३४, शिष्यवृत्त्या व विद्यावेतने या लेखाशिर्षाखाली सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०४०११६०३०८८२२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subrao Narayan Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859eae7920c9d0d1f622, cn=Subrao Narayan Shinde
Date: 2016.04.01 16:02:45 +05'30'

( सु.ना.शिंदे )
शासनाचे उप सचिव

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) सर्व विधानसभा/ विधानपरिषद सदस्य.
६) मा.मुख्य सचिव, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
७) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
८) महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
९) अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) प्रधान सचिव, सामाजिक न्याय, व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) प्रधान सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुगधव्यवसाय व मत्स्यविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) कुलगुरु, सर्व विद्यापीठे.
१६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
१७) संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१८) आयुक्त आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
१९) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
२०) अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, नागपूर, अमरावती.
२१) सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
२२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

Principal
Nutan Maharashtra Institute of Engineering & Technology
"Samarth Vidyapeeth" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech. PUNE 410507

२३) अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई.
२४) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
२५) सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षाची कार्यालये.
२६) सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी आदिवासी विकास विभाग.
२७) निवडनस्ती का-१२.

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech.

राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये सन २०१४-१५ मध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत.

## महाराष्ट्र शासन

### सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

### शासन निर्णय क्रमांकः इबीसी-२०१५/प्र.क्र. ४६ /शिक्षण-१

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२

दिनांक : ३० मार्च, २०१५

वाचा:-१) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
क्रमांक - इबीसी-२०१४/प्र.क्र. ४०/शिक्षण-१ दिनांक ४.३.२०१४

२) शासन परिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
क्रमांक - इबीसी-२०१४/प्र.क्र.४०/शिक्षण-१ दिनांक ८.७.२०१४

३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग
क्रमांक - इबीसी-२०१४/प्र.क्र.९०/तांशि-४ दिनांक २०.३.२०१५

प्रस्तावना-

शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषी विभाग व पशुसवंर्धन दुग्धव्यवसाय आणि मत्सव्यवसाय विभाग या विभागाच्या अधिपत्याखालील मान्यताप्राप्त विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रतिपूर्ती करण्याचा धोरणात्मक निर्णय शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून घेतलेला आहे. सदरहू निर्णय शैक्षणिक वर्ष २००७-०८, २००८-०९, २००९-१०, २०१०-११, २०११-१२, २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये कायम ठेवण्यात आलेला आहे. आता सदरहू योजना शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये आहे त्याच स्वरुपात एका वर्षासाठी सुरु ठेवण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती /भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना फी प्रतिपूर्ती करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech. PUNE 410507

## शासन निर्णय

राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी सन २०१४-१५ या वर्षी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती /भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क समिती, प्राधिकरण किंवा परिषदने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करण्यास खालील अटीच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ) **आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम (वैद्यकीय, दंत, होमिओपॅथी, युनानी, आयुर्वेद भौतिकोपचार, व्यवसायोपचार व नर्सिंग ) :-** असोशिएशन ऑफ मॅनेजमेंटस् ऑफ अनएडेड प्रायव्हेट मेडीकल अँड डेंटल कॉलेजेस ऑफ महाराष्ट्र, मुंबई यांनी आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षास राबविलेल्या प्रवेश प्रक्रीयेतून अथवा शासनाच्या सामाईक प्रवेश परीक्षाव्दारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ते त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करेपर्यंतच्या कालावधीसाठी लागू राहील. मात्र सदर प्रवेश प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर संस्था स्तरावर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जरी अशा प्रवेशांना प्रवेश नियंत्रण समितीने मान्यता दिली असली तरी या योजनेचा लाभ होणार नाही.

ब) **उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत :-** राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील पुढील व्यावसायिक ही योजना लागु राहील.

| पदविका | पदवी | पदव्युत्तर पदवी |
|---|---|---|
| अभियांत्रिकी | अभियांत्रिकी | एम.बी.ए./एम.एम.एस |
| औषधनिर्माण शास्त्र | औषधनिर्माण शास्त्र | एम.सी.ए. |
| एच.एम.सी.टी. | एच.एम.सी.टी. | -- |
| -- | वास्तुशास्त्र | -- |

क) **कृषी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग:-** राज्यातील चारही कृषि विद्यापीठांतर्गत कार्यरत असलेल्या मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित विद्यालय/महाविद्यालयामधील शासकीय कोटयातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्काची प्रतिपूर्तीपुढील अभ्यासक्रमांसाठी ही प्रतिपूर्ती योजना लागु राहील.

**कृषि विद्यालय (पदविका)**

**दुग्ध व्यवसाय विकास (पदविका )**

**कृषि व सलंग्न विषयाची महाविद्यालये (पदवी व पदव्युत्तर)**

**कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय (पदवी व पदव्युत्तर)**

**कृषि अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय (पदवी व पदव्युत्तर)**

Principal
Nutan Maharashtra Institute of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech. PUNE 410507

**ड) महाराष्ट्र शासनाच्या बी.एड व डी.एड अभ्यासक्रमाच्या प्रतीपूर्तीसाठी पूर्वीचे आदेश लागु राहतील. सदर अभ्यासक्रमांची प्रतीपूर्ती राज्य शासनाच्या अनुक्रमे उच्च व तंत्र शिक्षण विभाग व शालेय शिक्षण विभागाने निश्चित केलेल्या दराप्रमाणे अनुज्ञेय राहील.**

**२.सदरहू योजना सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात राबविण्यासाठी खालील अटी व शर्तीनुसार लागू राहतील:-**

(१) राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्काची १००% प्रतिपूर्ती त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत अनुज्ञेय राहील.

(२) विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये ४.५० लाखाच्या मर्यादेत असावे. या योजनेचा लाभ प्रथम वर्षाकरीता मिळाल्यानंतर ही सवलत त्याचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत अनुज्ञेय राहील. अशा विद्यार्थ्यांना दुस-या वर्षापासून दरवर्षी उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

(३) सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्काची १००% प्रतिपूर्ती व इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्काची ५०% प्रतिपूर्ती ही लागू राहील.

(४) आरक्षणाचा लाभ न घेता, गुणवत्तेनुसार खुल्या गटातील जागांवर प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठीसुद्धा सदर योजना लागू राहील.

(५) उपरोक्त योजना फक्त शासकीय कोटयातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच लागू राहील.

(६) तंत्र शिक्षणाःशी निगडीत पदविका पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी या योजनेचा लाभ ज्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेश घेतला आहे, अश्याच विद्यार्थ्यांना लागू राहिल. मात्र सदर प्रवेश प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर संस्था स्तरावर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जरी अश्या प्रवेशांना प्रवेश नियंत्रण समितीने मान्यता दिली असली तरी या योजनेचा लाभ होणार नाही.

(७) थेट व्दित्तीय वर्ष अभियांत्रिकी तसेच औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांनी जर शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेश घेतला असेल तरच त्यांना या प्रतिपूर्ती योजनेचा लाभ मिळेल. मात्र सदर प्रवेश प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर संस्था स्तरावर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जरी अश्या प्रवेशांना प्रवेश नियंत्रण समितीने मान्यता दिली असली तरी या योजनेचा लाभ होणार नाही.

(८) सदरहू योजनेचा लाभ ए.आय.ई.ई.ई. कोटयातून प्रवेश घेणा-या महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीय उमेदवारांनाही लागू राहील.

(९) अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना ही सवलत लागू राहाणार नाही.

(१०) अभिमत विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ही योजना लागू राहणार नाही.



Principal
Nutan Maharashtra Institute
of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

(११) ही सवलत एक किंवा दोन विषयांमध्ये अनुत्तीर्ण होऊन पुढच्या वर्गात ए.टी.के.टी. द्वारे प्रवेश घेतलेल्या [Allowed To Keep Term (A.T.K.T.) मिळालेल्या] विद्यार्थ्यांना अनुज्ञेय राहील.

यावर होणारा खर्च "मागणी क्रमांक एन-३ २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, २७७-शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना (०२) (१७) राज्यातील इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांसाठी शिक्षण फी व परीक्षा फी -(विघयो) (०४) (२०) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिक्षण फी व परीक्षा फी प्रदाने, (२२२५ ३८०५), ३४ शिष्यवृत्त्या/ विद्यावेतने " या लेखाशीर्षाखाली सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

यावर होणारा खर्च "मागणी क्रमांक एन-३ - २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, ०३-मागासवर्गाचे कल्याण, २७७-शिक्षण,(०२) (१७) राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकोत्तर शिक्षण फी व परीक्षा फी प्रदाने, (२२२५ ३२३३) ३४ शिष्यवृत्त्या/ विद्यावेतने" या लेखाशीर्षाखाली सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

यावर होणारा खर्च "मागणी क्रमांक एन-३ - २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, -०३-मागासवर्गाचे कल्याण, २७७-शिक्षण, (०२) (०४) शिक्षण फी व परीक्षा फी प्रदाने (२२२५ ०८-०६), ३४ शिष्यवृत्त्या/ विद्यावेतने " या लेखाशीर्षाखाली सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

यावर होणारा खर्च "मागणी क्रमांक एन-३ - २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, ०३-मागासवर्गाचे कल्याण, २७७-शिक्षण, (०२) (१४) विशेष मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकोत्तर शिक्षण फी व परीक्षा फी प्रदाने, (२२२५ २५९६), ३४ शिष्यवृत्त्या/ विद्यावेतने " या लेखाशीर्षाखाली सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१५०३३०१५०५२४९७२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Uke Ujjwal

Digitally signed by Uke Ujjwal
DN: c=IN, o=ALL INDIA SERVICE, ou=IAS, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Uke Ujjwal
Date: 2015.03.31 14:12:02 +05'30'

(उज्ज्वल उके)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव

२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Maharashtra Inst. of Engg. & Tech.

३) मा.मंत्री, सा.न्या. यांचे खाजगी सचिव
४) मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
५) मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
६) मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
७) मा.मंत्री, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
८) मा.राज्यमंत्री, सा.न्या.यांचे खाजगी सचिव
९) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०) प्रधान सचिव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
१६) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१७) संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८) सर्व प्रादेशिक उपायुक्त समाजकल्याण
१९) सर्व सहाय्यक आयुक्त समाजकल्याण
२०) सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
२१) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
२२) निवासी लेखा परीक्षक, मुंबई/अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
२३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२४) वित्त विभाग, (व्यय १४/अर्थसंकल्प-५),मंत्रालय, मुंबई
२५) कक्ष अधिकारी, विधानमंडळ अनुसूचित जाती कल्याण समिती (ड-४), १५ वा मजला, विधानभवन, मुंबई - ४०० ०३२. (५ प्रतीसह)
२६) निवड नस्ती, शिक्षण-१

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507



Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech.

राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागस प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्ती योजनेबाबत

# महाराष्ट्र शासन

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

## शासन परिपत्रक क्रमांक : इबीसी २०१४/प्र.क्र.४०/शिक्षण-१

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२

दिनांक : ०८ जुलै, २०१४

वाचा - शासन निर्णय समक्रमांक दिनांक ०४.०३.२०१४

**शासन परिपत्रक -**

राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतीपूर्ती संदर्भात सविस्तर आदेश संदर्भाधिन शासन निर्णयाव्दारे देण्यात आले आहेत. त्यानुसार विजाभज, विमाप्र व इमाव प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता पालकांच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रुपये ४.५० लाख इतकी आहे. त्या संदर्भात क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण होत असल्याने त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे -

"व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या व पालकाचे वार्षिक उत्पन्न रुपये ४.५० लाखाच्या मर्यादेत असलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यास शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ दिल्यानंतर ही सवलत त्याचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत अनुज्ञेय राहील. अशा विद्यार्थ्यांना दरवर्षी उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही."

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech. PUNE 410507

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१४०७०८१६४३१०२४२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pratap Pandurang Lubal

Digitally signed by Pratap Pandurang Lubal
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Social Justice &Spl Assistance, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Pratap Pandurang Lubal
Date: 2014.07.08 16:42:50 +05'30'

प्र.पां. लुबाळ

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री, सा.न्या. यांचे खाजगी सचिव
२. मा.राज्यमंत्री,सा.न्या.यांचे खाजगी सचिव
३. सचिव, सामाजिक न्याय, मंत्रालय, मंबई
४. आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. संचालक, विजाभज, विमाप्र व इमाव कल्याण, पुणे
६. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग
७. सहायक आयुक्त, समाजकल्याण, सर्व जिल्हे
८. निवड नस्ती, शिक्षण-१



Principal
Nutan Maharashtra Institute of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Maharashtra Inst. of Engg. & Tech.
PUNE 410507

शासकीय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त विनाअनुदानित व कायम विना अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या अनुसूचित जाती,विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या <u>प्रतिपुर्तीसाठी जाती वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत</u>

महाराष्ट्र शासन
शासन परिपत्रक क्रमांक:- सीबीसी-१२/२००८/प्र.क्र. ४२७ /मावक-५,
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय ,विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ३१ जुलै,२००८

वाचा :- १) शासन निर्णय,विमुक्त जाती, भटक्या जमाती ,इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग ,क्रमांक :-सीबीसी-१२/२०००/२५२ /प्र.क्र.१/मावक-५, दिनांक २५ जानेवारी, २०००

२) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग क्रमांक :-इमाव -२००७/प्र.क्र.१५०/मावक-३ , दिनांक १७ जुलै, २००८

३) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग क्रमांक :-इबीसी -२००८/प्र.क्र.१३८/मावक-२ , दिनांक १७ जुलै, २००८

<u>प्रस्तावना</u> :-संदर्भ क्रमांक १ वरील या विभागाच्या शासन निर्णय दिनांक २५ जानेवारी,२००० नुसार वैद्यकीय, अभियांत्रिकी , वास्तुशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणा-या अनुसूचित जाती , [illegible]मुक्त जाती, भटक्या जमाती , इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गांमधील जे विद्यार्थी इयत्ता ११ वी सायन्स [illegible]त असतील अशा विद्यार्थ्यांची जाती दावा पडताळणीचे प्रस्ताव त्यांच्या संस्थे मार्फत पडताळणी समितीकडे पाठविण्याबाबत विहित कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे. संदर्भ क्रमांक २ व ३ येथील शासन निर्णयानुसार त्यामध्ये नमूद व्यावसायिक अभ्यासक्रमाकरीता तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीसाठी जाती वैधता प्रमाणपत्राची अट घालण्यात आली आहे. असे जाती दावा पडताळणीचे प्रस्ताव संबंधित शैक्षणिक संस्थेमार्फत विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे सादर करण्या संदर्भात कार्यपध्दती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन परिपत्रक</u> :- राज्यातील शासनमान्यताप्राप्त शासकीय, अनुदानित,खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणा-या अनुसूचित जाती , विमुक्त जाती, भटक्या जमाती , इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गातील खालील व्यावसायिक अभ्यासक्रमांना (बी. एड. व डी. एड. कोर्स वगळून ) प्रवेश घेणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या जाती दाव्यांची पडताळणीचे प्रस्ताव संबंधित शैक्षणिक संस्थेने त्यांच्या कार्यक्षेत्रातील विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कडे पाठवावीत

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade 410507

Nutan Maharashtra Institute ... JUNE 07

अ) आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम (वैद्यकीय, दंत, होमिओपॅथी, युनानी, आयुर्वेद, भौतिकोपचार, व्यवसायोपचार व नर्सिंग )

ब) उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत असणारे

| पदविका | पदवी | पदव्युत्तर पदवी |
|---|---|---|
| अभियांत्रिकी | अभियांत्रिकी | एम.बी. ए. |
| औषधनिर्माण शास्त्र | औषधनिर्माण शास्त्र | एम.सी.ए. |
| एच.एम.सी.टी | एच.एम.सी.टी | |
| | आर्कीटेक्चर | |

क) कृषी, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच बी.एस.सी. (जैव तंत्रज्ञान)

ड) इ. १० वी ची शालांत परिक्षा ( S.S.C. / C.B.S.E व तत्सम ) उत्तीर्ण होऊन महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या पूर्णवेळ अभ्यासक्रमात शिकणारे विदयार्थी.

इ) "वास्तुशास्त्र" या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या ज्या विदयार्थ्यांनी इयत्ता १२ वी शिकत असताना तो शास्त्र अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अन्य अभ्यासक्रमातील असल्यामुळे उदा. वाणीज्य इत्यादी. जाती वैधता प्रमाणपत्र प्राप्त करु न शकलेले विद्यार्थी

२. वरील अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गातील विदयार्थ्यांना जाती वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची अट लागू करण्यात येत आहे. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग व कृषि व प.दु.म. विभागामार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील वरील अभ्यासक्रमासाठी मागासवर्गीय विदयार्थ्यांच्या प्रवेशाबाबत जाती वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासंदर्भात प्रचलित असलेले निर्देश / सूचना लागू राहतील.

संबंधित विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणीचे प्रस्ताव संबंधित शैक्षणिक संस्थेमार्फत, संस्थेच्या कार्यक्षेत्रात असणा-या विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे खालील कार्यपध्दतीनुसार सादर करणे अनिवार्य राहील.

अ) वरील अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्यांनी संबंधित शैक्षणिक संस्थेकडे प्रवेश घेतल्यापासून १ महिन्याच्या आत आवश्यक त्या कागदपत्रांसह परीपूर्ण प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील. त्याबाबत शैक्षणिक संस्थेने विद्यार्थ्यांना सुचना दयाव्यात व सुचनांना व्यापक प्रसिध्दी द्यावी.

ब) वरील "अ" प्रमाणे संस्थेकडे प्राप्त झालेले प्रस्ताव,संस्थेने ते प्राप्त झाल्यापासून ८ दिवसाच्या आत संबंधित जिल्हयाच्या विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचेकडे पाठवावेत.

क) वरील "ब" प्रमाणे प्राप्त झालेले प्रस्ताव विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी संबंधित विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे जसे प्राप्त होतील तसे तत्परतेने वेळच्या वेळी पाठवावेत.

ड) जाती प्रमाणपत्र समितीकडे प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव समितीने ३ महिन्याच्या आत निकाली काढावेत.

Principal
Nutan Maharashtra Institute
of Engg. & Technology
"Samarth Vidya Sankul" Vishnupuri
Talegaon Dabhade, 410507

Nutan Maharashtra Inst. of Engg. & Tech. PUNE-410507

४. विदयार्थ्यांच्या जाती दावा पडताळणीच्या प्रस्तावाबाबत वर दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्याबाबत शैक्षणिक संस्थांना आवश्यक त्या सूचना देण्यासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग , उच्च व तंत्रशिक्षण विभाग व कृषी व प.दु.म. विभाग यांनी योग्य ती कार्यवाही करावी . जाती वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती करण्यात येऊ नये.

५. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक क्रमांक :- २००८०७३११६१२३४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

( एन. आरुमुगम )
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव,
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव ,
मा. राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव,
प्रधान सचिव,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
संचालक, उच्च शिक्षण संचालनालय , महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय , महाराष्ट्र राज्य, मुंबई .
संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय , महाराष्ट्र राज्य, मुंबई .
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
आयुक्त, विमुक्त जाती भटक्या जमाती व इतर मागासवर्ग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी
सर्व सचिव तथा संशोधन अधिकारी, सर्व विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. १ , २ व ३,
यांचे कार्यालय, नवी मुंबई,कोकण भवन, रत्नागिरी, मुंबई उपनगर जिल्हा (वांद्रे), पुणे, कोल्हापूर , नाशिक, धुळे, औरंगाबाद, लातूर , नागपूर, चंद्रपूर ,
अमरावती, अकोला.
विभागीय समाजकल्याण अधिकारी (जात प्रमाणपत्र पडताळणी )सर्व विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. १ , २ व ३,
यांचे कार्यालय, नवी मुंबई,कोकण भवन, रत्नागिरी, मुंबई उपनगर जिल्हा (वांद्रे), पुणे, कोल्हापूर , नाशिक, धुळे, औरंगाबाद, लातूर , नागपूर, चंद्रपूर ,
अमरावती, अकोला.
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, गट-अ
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
समाजकल्याण अधिकारी, बृहन्मुंबई, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग,

निवड नस्ती - मावक-५